ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January-June 2022- Vol. 11 No. 1

# भारतीय स्त्रियांचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय विश्लेषण

**डॉ. शेख जहारा अब्दुल रहीम**
*सहयोगी प्राध्यापिका व विभागप्रमुख*
*समाजशास्त्र विभाग*
*लोकसेवा एज्युकेशन सोसयटीचे कला व विज्ञान*
*महाविद्यालय, औरंगाबाद*

**प्रस्तावना**

*भारतीय स्त्रीचे भारतात तसेच जगात दुय्यम स्थान होते. भारतीय स्त्री ही सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतीक धार्मिक बाबतीत वंचित असलेली दिसून येते. भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळण्यासाठी समाजसुधारकांनी आयुष्यभर लढा दिला. वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकर होता परंतु उत्तरवैदिक काळानंतर शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला.*

मध्ययुगीन काळात देखील अनेक धार्मिक बंधने स्त्रियांवर लादलेली होती. त्या काळात राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्यामुळेच स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळाला. स्त्रियांच्या शिक्षणाचा पुढाकार घेणा-यांमध्ये महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी तत्कालीन परिस्थितीशी संघर्ष केला. तत्कालीन समाजाचा त्रास सहन करुन सावित्रीबाईनी स्त्रियांमध्ये शिक्षणाची इच्छा जागृत केली. भारतीय स्त्रियांनी शिक्षणामध्ये उल्लेखनीय कार्य करुन योगदान दिले आहे.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्री व पुरुष हे दोन्ही घटक महत्वपूर्ण आहेत. स्त्री हा समाजाचा मुलभूत घटक आहे. संस्कारक्षम पिढी निर्माण करण्यामध्ये स्त्रियांचा महत्तवपूर्ण वाटा आहे. स्त्रियांचा महत्वपूर्ण गुण म्हणजे समर्पण भाव त्यामुळे ती सर्वाना आपलेसे करुन घेते. आणि दुसरा महत्वाचा गुण म्हणजे स्त्रियांमध्ये निरंतर कार्यक्षमता असते. त्यामुळे स्त्रियांनी ज्या क्षेत्रात प्रवेश केला तिथे त्यांना यशच मिळाले आहे. भारतामध्ये अनेक सामर्थ्यशाली स्त्रिया होऊन गेल्या. त्यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये भरीव असे योगदान दिले आहे.

**उदिदष्टये**

१. भारतीय समाजातील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. भारतीय समाजातील स्त्री समाजसुधारकांच्या उल्लेखनीय कार्याचा आढावा घेणे.
३. भारतीय स्त्रियांच्या शैक्षणिक कार्याचा सैध्दांतीक दृष्टीकोण अभ्यासणे.

**गृहितके**

१. भारतीय समाजव्यवस्थेतील शैक्षणिक स्थितीमध्ये बदल घडून येताना दिसतो.
२. भारतीय समाजातील स्त्री ही शिक्षित होऊन विविध क्षेत्रात कार्य करताना दिसते.
३. भारतीय स्त्री समाजसुधारकांच्या शैक्षणिक कार्यामुळे स्त्रियांना नवीन दृष्टी मिळाली आहे.

स्त्री ही भारतीय समाजव्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे. देशाचा सर्वांगीण विकासासाठी स्त्री व पुरुष दोघांच्याही शिक्षणाच्या प्रमाणात वाढ होणे गरजेचे आहे. भारतात स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य असल्याकारणाने आधुनिक काळात स्त्रियांचे शैक्षणिक क्षेत्रात फार मोठे योगदान आहे. अशाच काही धाडसी व पराकमी स्त्रियांचे कार्य पुढीलप्रमाने आहे.

सावित्रीबाई फुले या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका, समाजसुधारक आणि कवीयत्री होत्या. सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक क्षेत्रात फार उल्लेखनीय कार्य केले. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचे कार्य यशस्वीपणे पार पाडून समाजापुढे नवा आदर्श निर्माण केला. त्या काळात समाज हा स्त्रीशिक्षणाच्या विरोधी होता. स्त्रियांनी शिक्षण घेणे हे धर्माच्या विरोधी होते. शिक्षणाच्या प्रसारामध्ये महात्मा फुलेंनी त्यांना साथ दिली. एक स्त्री शिकली की संपूर्ण कुटूंब शिक्षित होते. असे महात्मा फुलेंचे मत होते यामुळे शिक्षणाचे महत्व ओळखून आपले संपूर्ण आयुष्यभर सावित्रीबाई फुलेनी स्त्रीशिक्षणाचे कार्य केले. शिक्षणाचा महामंत्र देणा-या सावित्रीबाई, एक विलोभनीय त्यागी व प्रभावी व्यक्तीमत्वाचे मूर्त रुप आहे. त्यांनी १८४८ मध्ये बुधवार पेठेतील भिडे वाडयात मुलीची पहिली शाळा काढली. भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका व मुख्याध्यापिका बनल्या. सावित्रीबाई जेव्हा मुलीना शाळेत शिकवायला जायच्या तेव्हा सुद्धा त्यांनी आपले कार्य मागे सोडले नाही. आज त्यांच्या शिक्षणक्षेत्रातील योगदानामुळे स्त्रिया या विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबर कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी सामाजिक कार्येसुद्धा केली. सतीप्रथा, केशवपण यासारख्या प्रथांवर त्यांनी कठोर हल्ले सुद्धा केले. सतीप्रथेविरुद्ध कठोर आंदोलन केले तसेच नाभिक समाजाशी संवाद साधून केशवपण विरुद्ध देखील तीव्र आंदोलन सुरु केले. विधवा पुर्नविवाहाचा पुरस्कार केला. विधवांची मुले स्वताच्या मुलाप्रमाणे सांभाळली व त्यांना आत्मनिर्भर बनविले. अनाथ मुलाला दत्तक घेऊन त्यांचा सांभाळ केला व त्याला डॉक्टर बनविले. असे सावित्रीबाई फुलेंनी सामाजिक व शैक्षणिक महत्वपूर्ण योगदान दिले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई त्यांना आपण राजमाता जिजाबाई असे म्हणतो. जिजाबाई यांनी केलेल्या संस्कारातून छत्रपती शिवाजी महाराज निर्माण झाले. जिजाबाई यांनी आपल्या जीवनात आलेल्या सर्व संकटाचा धैर्याने व साहसाने सामना केला. जिजाबाई यांचे जीवन धैर्य, त्याग, साहस व बलिदानाने परिपूर्ण होते. जिजाबाईंनी लहानपणी शिवरायांना अनेक शूरवीरांच्या कथा सांगून त्यांना हिंदवी स्वराज्य स्थापण करण्यासाठी प्रेरणा दिली. शिवरायांना आपल्या आईचे अमुल्य असे मार्गदर्शन लाभले. जीजामाता स्वराज्याची स्फूर्ती होत्या. शिवाजीच्या अनुपस्थितीत त्याच राज्यकारभार बघत होत्या. न्यायनिवाडे करत होत्या. हिंदू साम्राज्याच्या स्थापणेतही त्यांची भूमिका महत्वपूर्ण होती. जीजामाता हया प्रखर परिवर्तनवादी होत्या.

इंदिरा गांधींना सुरुवातीपासूनच देशभक्तिची भावना होती. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी काही स्वातंत्र्य सैनिकांच्या मदतीने त्यांनी लहान मुलांची वानरसेना नावाची संघटना स्थापण केली. ब्रिटिश सरकार विरोधी मोर्चे, निदर्शने अशी कामे ही वानरसेना करीत असे. १९६०मध्ये इंदिरा गांधी यांना कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी निवडण्यात आले. १९६४ साली लालबहादूर शास्त्री यांच्या मंत्रिमंडळात इंदिराजी सूचना आणि प्रसारमंत्री झाल्या. लालबहादूरशास्त्री यांच्या निधनानंतर त्या पंतप्रधान बनल्या व एक शक्तीशाली नेता म्हणून उभ्या राहिल्या.

लोकशाही राष्ट्रात देशातील सर्व नागरिक कायदयापुढे समान असले पाहिजे या धोरणांचा अंगिकार करुन १९७१ मध्ये त्यांनी एक धाडसी पाऊल उचलले आणि भारतीय राज्यघटनेत दुरुस्ती करुन संस्थाने खालसा केली. आपल्या खंबीर नेतृत्वाने त्यांनी भारताला प्रगतीपथावर नेले. आंतरराष्ट्रीय दबावापुढे अजिबात मान न तुकविता भारताला अणुसंपन्न करण्याचा इंदिराजींचा निर्णय सुद्धा असाच ऐतिहासिक ठरला त्यांनी १८ मे १९७४ रोजी पोखरण येथे पहिली अणुचाचणी घडवून आणली.

रमाबाई रानडे यांनी ज्येष्ठ समाजसुधारक म्हत्वपूर्ण कार्य केले आहे. रमाबाई रानडे यांचा वयाच्या अकराव्या वर्षी महादेव गोविंद रानडे यांच्या सोबत विवाह झाला. लग्नानंतर पतीच्या सहकार्याने त्यांनी शिक्षण घेतले. मराठी, हिंदी, बंगाली भाषेमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केले. स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी व व्यासपीठ निर्माण करण्यासाठी त्यांनी हिंदू लेडिज सोशल क्लबची मुंबईमध्ये स्थापणा केली. स्त्री समाज चळवळी मध्ये देखील सामील झाल्या. पुण्यातील सेवासदन या संस्थेची स्थापणा केली. १८९५मध्ये रमाबाईंच्या व्यवस्थापनेखाली स्त्रियांच्या कलाकौशल्यांच्या वस्तूंचे सोशल कॉनफरण्स समवेत प्रदर्शन भरवले व स्त्रीयांना रोजगार संधी उपलब्ध करुन दिली. रमाबाई रानडे हया आधुनिक चळवळीच्या अग्रणी नेत्या होत्या. स्त्रीयांना आर्थिक दृष्टया खंबीर आणि स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. रमाबाईंचा सामाजिक कार्यातील सहभाग पाहून इतर स्त्रियांचा सामाजिक कार्यातील सहभाग वाढला.

सिंधूताई सपकाळ या अनेक अनाथ लोकांच्या आई होत्या.सिंधूताईनी आयुष्यात खुप त्रास सहन केला. त्यांना सासर व माहेर दोन्हीकडच्या लोकांनी त्यांच्यापुढे पाठ फिरविली. पोट भरण्यासाठी भिक मागण्याची पाळी त्यांच्यावर आली. स्टेशनवर उघडयावर राहणे त्यांना शक्य वाटत नव्हते. म्हणून त्यांनी स्मशान गाठले. त्या तेथे राहू लागल्या. अशा अवस्थेतही त्यांनी रस्त्याने जाणा-या येणा-या भिका-यांना आपलेसे मानून त्यांचा सांभाळ केला. आज माईच्या अनाथ आश्रमात दोन दिवसांच्या बाळापासून तर ऐंशी वर्षाच्या वृद्धांपर्यत सगळेच आहेत. काही वर्षापूर्वी माईंनी चिखलद-यात वसतीगृह सुरु केले. आज बरेच मुलेमुली या ठिकाणावर राहून शिक्षण घेतात. माझे मुल इंजीनियर डॉक्टर आहेत. हे सांगताना त्यांचा चेहरा प्रसन्न दिसतो. त्यांच्या या कार्याबददल त्यांना बरेच पुरस्कार मिळाले.

किरण बेदी या भारताच्या पहिल्या महिला ऑफीसर म्हणून ओळखल्या जातात. त्या अत्यंत धाडसी व कर्तृत्ववान होत्या.आपल्या उत्कृष्ट कामगिरीतुन देशाचे नाव उज्वल करावे अशी त्यांची महत्वाकांक्षा होती म्हणूनच त्या भारतीय महिला सेवेतील उच्च पदावर पोहोचल्या.

एक पोलीस अधिकारी म्हणून आपल्या संपूर्ण कारकिर्दी मध्ये डॉ. किरण बेदी यांनी प्रवाहाविरुद्ध पोहोचण्याची आणि कामाचे नेहमी नवीन क्षेत्र स्विकारण्याची हिंमत दाखवली. पोलीसांनी केवळ गुन्हा शोधून काढण्यापेक्षा प्रतिबंधक उपाय आणि सुधारणेला सर्वाधिक महत्व दयावे या आपल्या मताचा त्यांनी सतत पाठपुरावा केला. सरकारमधील तसेच सरकार बाहेरच्याही अनेकांना त्यांनी हादरा दिला. आपल्या कार्याला विशाल आणि व्यापक परिमाण देण्याची यांची वृत्ती सत्तेवरच्या लोकांनाही माहित झाली. दिल्लीच्या तुरुंग महानिरीक्षक म्हणून सुद्धा त्यांनी कामगिरी बजावली.

**सारांश**

भारतीय स्त्रियांनी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. जोपर्यंत स्त्रियांची स्थिती सुधारणार नाही तोपर्यंत समाजाची व देशाची स्थिती सुधारणार नाही. भारतीय स्त्री ही प्रत्येक क्षेत्रात पुरुषांबरोबर कार्यरत आहे. भारतीय स्त्रियांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वताच्या अस्तित्वाची निर्मिती करुन आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास केला. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यात वैचारिक परिपक्वता निर्माण झाली व त्यांनी समाजपरिवर्तनाला चालना दिली. स्त्रियांच्या शैक्षणिक योगदानामुळे त्या आत्मनिर्भर व स्वावलंबी बनल्या आहेत. भारतीय स्त्री शैक्षणिक योगदानाच्या माध्यमातून कुटूंबाचा समाजाचा व राष्ट्राचा विकास साधण्याच्या दृष्टीकाणातून आपले योगदान देताना दिसत आहेत. देशाच्या

संपूर्ण विकासामध्ये पुरुषांप्रमाणेच स्त्रियां सुद्धा महत्वाची भूमिका पार पाडतात.

**संदर्भग्रंथः**

१. *स्त्रियांची भरारी – डॉ.खडसे यशवंत*
२. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर*
३. *भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह – पवार ना.ग.*
४. *भारतीय शिक्षणप्रणालीचा विकास – पवार एम. डी.*